**प्रेस नोट**

# उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

ग्रामीण भागातील गरीबीचे निर्मुलन करण्यासाठी केंद्र शासनाच्या सूचनान्वये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) या संस्थेची स्थापना करण्यात आली राबविण्यात येत आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान -'उमेद' अंतर्गत राज्य, जिल्हा व तालुकास्तर मिळून २९०१ एवढे कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. अभियानांतर्गत कार्यरत असणारे कंत्राटी मनुष्यबळ राज्य शासनाच्या धोरणनुसार बाह्यस्थ संस्थेमार्फ़त सद्यस्थितीत देय असलेल्या मानधनावर उपलब्ध करुन घेण्यात येत असून अभियानातील कंत्राटी कर्मचा-यांना कमी केले जाणार नाही.

**अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समुदायस्तरीय संस्थां जसे की ग्रामसंघ व प्रभागसंघ यांच्यामार्फ़त समुह संसाधन व्यक्तींची (Community Resource Person- CRP) नेमणूक मानधनी तत्वावर वरील संस्थामार्फ़त करण्यात आलेली आहे. अभियानांतर्गत सद्यस्थितीत सुमारे ५३००० समुह संसाधन व्यक्ती कार्यरत आहेत. अभियानाच्या अंमलबजावणीमध्ये या समुदाय संसाधन व्यक्तींची म्हत्त्वपुर्ण भूमिका असून समुदायस्तरीय संस्थांच्यामाध्यमातून त्यांच्या सेवा यापुढेही समुदायास उपलब्ध होणार आहेत. ग्रामसंघ व प्रभागसंघांना शासनाकडून अभियानाच्यामार्फ़त उपलब्ध होणा-या निधीमधून समुदाय संसाधन व्यक्तींचे मानधन पुर्वीप्रमाणेच अदा होणार आहे.**

**अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या सर्व योजना, प्रकल्प व कार्यक्रम यापुढेही पुर्ववत सुरु राहणार आहेत. तरी विविध प्रसार माध्यमाच्याव्दारे प्रसिध्द होणा-या बातम्या व वृत्तामुळे समुदाय संसाधन व्यक्तीं व स्वयं सहाय्यता गटांमध्ये अभियान बंद होणार आहे अशा स्वरुपाचे गैरसमज निर्माण होत आहे. तरी अभियनासंबंधाने पसरविण्यात येत असलेल्या अशा स्वरुपाच्या अफ़वांवर कोणीही विश्वास ठेवू नये.**

गरीबांना गरीबीतून बाहेर पडण्याची तीव्र इच्छा असते त्यासाठी त्यांना पोषक वातावरणाची आवश्यकता असते हे सुत्र लक्षात घेऊन अभियान सुरु झाल्यापासून माग़ील आठ वर्षात तयार करण्यात आलेले स्वयं सहाय्यता गटांना प्रशिक्षण देऊन व आर्थिक सहाय्य करुन त्यांच्या व्यवसायाच्या प्रगतीसाठी अभियानांतर्गत सातत्याने काम करण्यात येत आहे. अभियानांतर्गत तयार झालेले स्वयं सहाय्यता गटातील महिला अभियानाच्या माध्यमातून स्वयंपुर्ण होत असून त्यांच्याकडे उपजीविकेचे स्त्रोत निर्माण करण्यात येत आहेत. गरीबांच्या समुदायस्तरीय संस्था तयार करुन त्यांची क्षमता बांधणी करुन त्यांच्या स्वयंपुर्ण बनविणे हे शासनाचे धोरण आहे. तरी अभियानांतर्गत कार्यरत स्वयं सहाय्यता गट, ग्रामसंघ, प्रभाग़संघ व समुदाय संसाधन व्यक्ती यांनी अभियानासंबंधित अफ़वांवर कोणीही विश्वास ठेवू नये. त्यांनी त्यांचे काम पुर्ववत पध्दतीने व अधिक जोमाने सुरु ठेवावे असे मी आवाहन करत आहे.

Pravin Jain

प्रविण जैन

मुख्य कार्यकारी अधिकारी

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

Scanned with CamScanner